# K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR
## ASSESSMENT – IV (2022-23)

**GRADE: III** **MARKS: 40**
**SUB: MARATHI** **TIME: 2 HRS**

**प्रश्न १. खालील पठित उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(६ गुण)**

राजाने त्याचे बोलणे ऐकले व लगेचच गृहमंत्री, तेनालीराम व काही गावकऱ्यांना बरोबर घेऊन विहीरीचे निरीक्षण करायला गेले. पूर्ण राज्याचे निरीक्षण केल्यानंतर त्याला असे जाणवले की राज्याच्या आसपास, गावातील अन्य ठिकाणी एकही विहीर नाही. राजाला हे समजल्याचे बघून गृहमंत्री घाबरला. सत्य स्थितीत त्याने फक्त काही विहीरी बनविण्याचे आदेश दिले होते व उरलेला सर्व पैसा त्याने आपल्या सुख सुविधांसाठी ठेवून घेतला होता.

आत्तापर्यंत राजाला तेनालीरामाच्या बोलण्याचा अर्थ समजलेला होता. ते गृहमंत्र्यावर रागवायला लागले, तेव्हा तेनालीराम मध्येच बोलला, "महाराज या सर्वामध्ये यांची काहीही चूक नाही. वास्तवमध्ये सर्व विहीरी या जादूच्या होत्या. ज्या बनल्यानंतर काही दिवसातच गायब झाल्या."

**अ) खालील इंग्रजी शब्दांचे मराठी अर्थ उताऱ्यातून शोधून लिहा.**

१. Home minister- २. Well - ३. Order-

**आ) खालील वाक्य चूक की बरोबर ते लिहा.**

१. राज्याच्या आसपास, गावातील अन्य ठिकाणी एकही विहीर नाही.
२. राजा तेनालीरामावर रागवायला लागले.
३. विहीरी या जादूच्या होत्या.

**प्रश्न २.खालील शब्दांचे अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.** **(४ गुण)**

१. नम्र –
२. सत्याग्रह –

**प्रश्न ३. खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.** **(३ गुण)**

१. मुलाला काय खाण्याची सवय होती?
२. चुकीच्या सवयीमुळे आपले काय होते?
३. राज्यातील चोर काय चोरत होते?

**प्रश्न ४. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२ गुण)**

१. नव्याने विहीरी बांधण्याची जबाबदारी कोणावर सोपवण्यात आली?
२. गांधीजींनी मुलाला कोणता सल्ला दिला?

**प्रश्न ५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **(४ गुण)**

१. गांधीजींनी मुलाला व त्याच्या आईला आठ दिवसांनी का बोलाविले?
२. राजा समाधानी का झाले?

**प्रश्न ६. खालील अपठित उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(६ गुण)**

सुषमा वळणदार अक्षर काढण्याच्या प्रयत्न करत होती. मनासारखे अक्षर येईना. तिने तो कागद फाडला. दुसरा घेतला. समाधान होईना. तोही फाडून फेकला. असे कितीदा तरी लिहिले. किती कागद चुरगाळले, फाडले, फेकले. शेवटी तिला कंटाळा आला. कागद, पेन ठेवून ती झोपी गेली.

खोलीत जिकडे तिकडे विखुरलेले कागदाचे तुकडे ! तेच तिच्या स्वप्नात आले. तिच्या भोवती गरगर फिरू लागले. एक तुकडा म्हणाला, "सुषमा, तुझं अक्षर चांगलं आलं नाही, त्याचा राग तू आमच्यावर का काढलास ? शेवटी तुला कागदावरच लिहावं लागणार आहे ना!"

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. कागद, पेन ठेवून ती __________ गेली.

२. मनासारखे ___________येईना.

३. तिच्या भोवती ____________ फिरू लागले.

**आ)खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

१. सुषमा काय काढण्याचा प्रयत्न करत होती ?

२. खोलीत जिकडे तिकडे काय विखुरले होते ?

३. सुषमाला शेवटी कशावर लिहावे लागणार आहे?

## व्याकरण विभाग

**प्रश्न ७. अ) खालील अंक अक्षरात लिहा.** **(२ गुण)**

१. ३१ - २. ४० -

**आ) खालील वाक्यांतील सर्वनामे ओळखा व लिहा.** **(३ गुण)**

१. ती बाग सुंदर आहे.

२. आम्हांला खूप आनंद झाला.

३. त्यांनी नवीन गाडी घेतली.

**इ) खालील नामांची लिंग ओळखा व लिहा. ( पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग )** **(३ गुण)**

१. फुलपाखरू – २. भाजी – ३. मोर –

**ई) पुढील नामांआधी तो, ती किंवा ते लिहा.** **(२ गुण)**

१. ____डबा २. ____ शाळा

## लेखन विभाग

**प्रश्न ८. खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द निवडून अर्थपूर्ण कथा तयार करा. (५ गुण)**

**अ) ( व्यापारी, खजील, गावी, चोर, धर्मशाळेत, पैसे, उशी, अंथरुण, झोपी, मूर्ख)**

**व्यापाराची शिकवण**

एक होता ----------. एके दिवशी तो खूप पैसे असलेली पिशवी घेऊन ---------- निघाला होता. वाटेत त्याला एक ---------- भेटला. रात्री दोघेही एकाच ---------- राहिले. व्यापारी गाढ ---------- गेला. चोर हळूच उठला. त्याने व्यापाऱ्याची पिशवी तपासली. त्याचे ---------- तपासले. पण त्याला पैसे मिळाले नाहीत.

दुसऱ्या दिवशी सकाळी दोघे पुन्हा चालत निघाले. चालता चालता चोर व्यापाऱ्याला म्हणाला, “मी एक चोर आहे. मी रात्री तुमचे ---------- शोधले. पण मला मिळाले नाहीत. मला खूप आश्चर्य वाटले. तुम्ही ते कोठे ठेवले होते?”

व्यापारी म्हणाला, " मी ते तुझ्या ---------- खाली ठेवले होते. चोर ---------- झाला. अरेरे! खरोखरच मी ---------- आहे. "

**किंवा**

**अ) तुम्ही तुमच्या मित्राला/ मैत्रिणीला तुमच्या वाढदिवसाचे आमंत्रण देण्यासाठी पत्र लिहा.**

***********************************************************